# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित विद्यापीठ)

(सामान्य प्रशासन)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांकः कार्यालय : ०७१२–२५२२९११, फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्रमांकः रातुमनावि/संविक/स/२४०६
दिनांकः १७ जून २०१६

प्रति,

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख
२. विद्यापीठ संचालित महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य व संचालक
३. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखाप्रमुख

विषयः दिनांक २१ जून २०१६ रोजी दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याबाबत.

संदर्भः १.सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दिनांक २९ फेब्रुवारी २०१६ रोजीचे पत्र.
२.मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक ९ जून २०१६ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र, पुणे यांच्या संदर्भिय पत्रांना अनुसरून **दिनांक २१ जून २०१६ रोजी सकाळी ७.३० वाजता** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या **दीक्षांत सभागृहात दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिवस** साजरा करण्यात येणार आहे. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त योगपटू **कु. धनश्री सुधीरराव लेकुरवाडे** ह्या योगाबाबतचे महत्व पटवून देणार असून त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविणार आहेत. प्रस्तुत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू **मा. डॉ. सिध्दार्थविनायक काणे** हे भूषविणार असून प्र–कुलगुरू **डॉ. प्रमोद येवले** यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

करिता आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे व आपण देखील या कार्यक्रमास उपस्थित राहावे.

आपला

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव